**MHST0500 0503 2020**

| |
|---|
| **नियमित दिवाणी मुकदमा क्र.६६७/२०२०** |
| **ओगले ग्लास वर्कस लि. तर्फे** |
| **संचालक व कुलमुखत्यार** |
| **वि.** |
| **१. राजाराम पांडूरंग पाटील व इतर** |

**वादीतर्फे विधीज्ञ – श्री. आर. डी. कदम**

**प्रतिवादींतर्फे विधीज्ञ – श्री. व्ही. बी. पाटील.**

**निशाणी १५९ वरील आदेश**

प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी अर्जात नमूद कारणांवरून पोलीस संरक्षण मिळावे याकरीता दिलेला आहे.

०२. अर्ज व त्यावरील म्हणणे पाहिले. दोन्ही बाजूच्या विद्वान विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

०३. The Ld. Advocate for the plaintiff placed his reliance on the decisions of :-

(a) **Ratanbai w/o. Narayanrao Naik & Anr. Vs. Satwarao s/o narayanrao Naik reported in 1995(1) Mh.L.J.529**, wherein Hon'ble Bombay High Court it is held that,

> "Police help is an extra ordinary mode or procedure to implement the execution of a decree or order. The prayer for police help may be made by decree holder either in an application under Rule 97 and or 98 of Order 21 of the Code of Civil Procedure or separately without filing such application or before any specific obstruction made by a particular person. Besides these provisions, it is always

open to a party to evoke the jurisdiction under Section 151 of the Code of Civil Procedure for grant of said relief. Police help is to be regarded as an extreme step, and as such it should not recommended unless the Court is fully convinced of the existence of a grave emergency. The special procedure for police help would not be allowed unless there are reasonable grounds to suppose that the execution will not be effected without serious danger to public peace, because of apprehension of violence or obstruction from the judgment debtor himself or because of the conditions of general character as such where the execution will have to be done in disturbed state or a class of people similarly situated being likely to make common cause that the judgment debtor can resist the execution."

(b) **P. Shankarrao Vs. Smt. B. Susheela reported in AIR 2000 Andhra Pradesh 214**, wherein Hon'ble Court it is held that,

> "Court in its inherent powers u/s. 151 of the Code of Civil Procedure can grant police aid to ensure effective implementation of temporary injunction pending suit for perpetual injunction. Procedure under Order 39 Rule 2A of C.P.C. or Contempt of Courts Act need not be followed."

०४. प्रस्तुत अर्जामध्ये वादीचे असे कथन आहे की, वादीने दावा प्रतिवादींचे विरूध्द जाहिर ठराव व निरंतरची मनाई हुकूम या मागण्यांकरीता दाखल केला आहे. न्यायालयाने प्रतिवादींचे विरूध्द एकतर्फा मनाई हुकूमाचा आदेश केलेला असताना प्रतिवादी क्र.३ ने दांडगाईने व अनाधिकाराने त्या आदेशाचा जाणून बुजून अवमान करून दि.१९/०७/२०२४ रोजी रात्रीचे सुमारास दावा कलम १ पैकी सिटी सर्वे क्र.७३३ या मिळकतीत असलेले पोस्टाचे चौकोनी इमारतीवरील कौले काढून कुलूप तोडून मिळकतीची नुकसान केलेले आहे. सदर बाब वादी यांनी कराड शहर पोलीसांत तक्रार

देण्याचा प्रयत्न केला असता पोलीसांनी सदरची बाब ही दिवाणी स्वरूपाची असल्याने न्यायालयातून पोलीस मदतीचा आदेश आणावा असे तोंडी सांगितले. प्रतिवादी यांनी न्यायालयाचे हुकूमाचा जाणूनबूजून अवमान चालू ठेवला आहे. सदरचे कृत्य असेच चालू राहिल्यास वादीचे किंमतीत न भरून येणारे कायमस्वरूपी नुकसान होणार आहे. म्हणून प्रस्तुतचा अर्ज दाखल करण्यात आलेला आहे.

०५. प्रतिवादी क्र.१ ते ८ यांनी नि.क्र.१४८ चे अर्जावर नि.क्र.१५७ ला म्हणणे देवून अर्ज नामंजूर करावा अशी विनंती केलेली होती. त्यानंतर वादीने नि.क्र.१५९ चा अर्ज दिलेला आहे. सदरच्या अर्जास प्रतिवादी क्र.१ ते ८ यांनी नि.क्र.१६१ ला सविस्तर म्हणणे देवून खालील मुद्दे उपस्थित केलेले आहेत. त्यात प्रामुख्याने प्रतिवादींचे असे कथन आहे की, अर्ज खोटा व लबाडीचा आहे. वकीलपत्रावर कंपनीचा शिक्का नाही, कंपनीने श्री. रविंद्र कदम व सागर कदम यांचे नावे दावा चालविणेचा ठराव केलेबद्दल कसलाही ठराव जोडलेला नाही. वादीने पुन्हा नि.क्र.१५८ ला नवीन वकीलपत्र कंपनीचे शिक्याचे घातलेले आहे. त्यावर कंपनीचे सिल नाही. त्यामुळे अर्ज व वकीलपत्र रद्द करण्यात यावे. वादी यांचे कुलमुखत्यारपत्र दि.१४/०६/२०२४ रोजी रद्द केलेले आहे. मुकुंद कदम यांना कंपनीचे वतीने दाव्यात हजर राहता येणार नाही. अर्जदाराविरूध्द शहर पोलीस स्टेशनला गु.र.क्र.१८१/२०२४ हा दाखल झालेला आहे. त्यामध्ये अर्जदारास पोलीस कोठडी दिलेली होती. तसेच मुकुंद कदम याचे विरूध्द गु.र.क्र.८०९ हा दि.१८/११/२०२१ रोजी, गु.र.क्र.६०९ हा दि.२४/११/२०२० रोजी दाखल झालेला आहे. अर्जात नमूद केलेल्या मिळकतीचा कब्जा मिळविणेसाठी दरखास्त क्र.९२/२००२ ही दाखल केली असून त्यामध्ये मिळकतीचा कब्जा प्रतिवादी क्र.१ यांना मूळ मालक यांनी दिलेला आहे. पोस्टाची इमारत ही सिटी सर्वे क्र.७३३ मध्ये होती. सदर मिळकतीचा कब्जा घेण्याकरीता दरखास्तदार गेले असता पोस्ट ऑफिस यांचेवतीने कब्जा घेण्यास हरकत अडथळा केलेमुळे पोस्ट ऑफिस यांचेतर्फे दरखास्तदार यांचे विरूध्द कब्जा घेवू नये म्हणून नि.दि.मु.क्र.२३/२००४ दाखल केला होता. त्या दाव्याचा निकाल गुणदोषावर

होवून भारत सरकारचा अर्ज फेटाळणेत आला. त्यावर त्यांनी जिल्हा न्यायालयात अपील केलेले होते. ते ही अपील नामंजूर झालेले आहे. पोस्टाने प्रतिवादी यांना कब्जा दिलेला आहे. वादीचा त्या मिळकतीशी व दाव्यातील मिळकतीशी कसलाही संबंध नव्हता व नाही. भारत सरकारने त्या निर्णयावर नाराज होवून मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे पहिले अपील दाखल केले आहे. परंतू, त्यामूध्ये स्थगिती आदेश नाही. सदरचे पोस्ट ऑफिस हे सध्या जागा सोडून दुसरे जागेत स्थलांतरीत झालेले आहे. त्यामुळे सदरचा अर्ज करण्याचा वादीस अधिकार नाही. वादीने नि.दि.मु.क्र.३२/२०१५ दाखल केला असून त्यामध्ये आपण सरकारचे भाडेकरू असल्याची तक्रार केलेली आहे. सरकारने कैफियत देवून सदरची जागा ही केव्हाही सरकारचे मालकीची नव्हती अशी कैफियत दिलेली आहे. त्यावरून वादी हे दावा मिळकतीचे मालक नव्हते हे स्पष्ट होते. या सर्व कारणांचा विचार करता वादीवर गुन्हा दाखल व्हावा व खोटा अर्ज दाखल केलेला असल्याने प्रतिवादींना र.रू.२५,०००/– नुकसान भरपाई मिळावी अशी मागणी केलेली आहे.

०६. अभिलेख पाहिला असता असे दिसून येते की, वादीने प्रस्तुतचा दावा प्रतिवादी यांचे विरूध्द जाहिर ठराव व निरंतरची मनाई हुकूम या मागण्यांकरीता दाखल केला आहे. वादीने मूळ दावा दाखल केला त्यावेळी त्यामध्ये एकूण ३ प्रतिवादी होते. त्यानंतर वादीने नि.क्र. ८९ दावा दुरूस्तीचा अर्ज दाखल केला. तो अर्ज दि.१६/०९/२०२२ रोजी मंजूर झाल्यानंतर वादीने आवश्यक त्या दुरूस्त्या केल्या व दुरूस्त दाव्याची प्रत अभिलेखावर दाखल केली. दुरूस्त दाव्याच्या प्रतीमध्ये एकूण १२ प्रतिवादी सामील असल्याचे दिसून येतात. प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी न्यायालयात हजर होवून नि.क्र.३५ वर म्हणण्यासह कैफियत देवून दाव्यास व तुर्तातूर्त मनाई हुकूमाच्या अर्जास हरकती नोंदविलेल्या आहेत. वादीने तुर्तातूर्त मनाई हुकूम मिळावा म्हणून नि.क्र.५ ला अर्ज दावा दाखल केला त्याच दिवशी दिला होता. त्या अर्जावर या न्यायालयाचे पूर्व पिठासिन अधिकारी यांनी दि.३०/११/२०२० रोजी प्रतिवादी क्र.३ यांचे विरूध्द एकतर्फा तात्पुरता मनाई आदेश पारीत करून पुढे दावा मिळकतीमध्ये न्यायालयात हजर

होईपावेतो पुढे बांधकाम करू नये असा आदेश पारीत केलेला आहे. सदरचा आदेश पुढे वाढवून मिळावा याकरीता वादी यांच्यातर्फे नि.क्र.१०० अर्ज दाखल करण्यात आला होता. त्यावर प्रतिवादी यांनी म्हणणे दाखल न केल्यामुळे या न्यायालयाचे पूर्व पिठासिन अधिकारी यांनी दि.१६/११/२०२१ रोजी आदेश पारीत करून पुढील आदेश होईपावेतो तो आदेश कायम करण्यात आला आहे असा आदेश पारीत केलेला दिसून येतो. त्यानंतर वादी यांनी नि.क्र.१४८ वर पोलीस मदत मिळावी याकरीता अर्ज दाखल केला होता. वादी यांचे तर्फे त्यांचे कथनास पुष्टी व दुजोरा मिळावा याकरीता नि.क्र.१५० अर्ज देवून दि.२०/०७/२०२४ रोजीचे दावा मिळकतीचे फोटो, नि.क्र.१५३ ला अर्ज देवून दि.२४/०७/२०२४ रोजी प्रतिवादींचे विरूध्द कराड शहर पोलीस स्टेशन यांचेकडे दिलेली तक्रारी अर्जाची प्रत व त्याची पोहोच, जे.सी.बी. च्या सहाय्याने चाललेल्या कामाचे फोटो, नि.क्र.१५६ चे यादीन्वये गु.र.क्र.१८१/२०२४ च्या रिमांड यादीची छायांकित प्रत, रिमांडच्या नकलेची छायांकित प्रत, दि.२४/११/२०२० व दि.१८/११/२०२१ रोजीच्या प्रथम खबरी अहवालाच्या छायांकित प्रती, दि.०८/०४/२०२४ रोजी दैनिक पुढारी, ऐक्य, तरूण भारत, या वृत्तपत्रांमध्ये आलेल्या बातम्यांच्या कात्रणाची छायांकित प्रती दाखल केलेल्या आहेत. तसेच नि.क्र.१६७ चे यादी समवेत गु.र.क्र.११९१/२०१४ या दि.१२/०८/२०२४ रोजी दाखल झालेल्या प्रथम खबरी अहवालाची प्रत दाखल करण्यात आलेली आहे. याउलट, प्रतिवादी यांच्यातर्फे नि.क्र.१६३ च्या यादीसमवेत फौजदारी खटला क्र.४८/२०१३ मधील अंतिम अहवालाची छायांकित प्रत, नियमित फौजदारी खटला क्र.२२७/२०१८ चे अंतिम अहवालाची छायांकित प्रत, नियमित फौजदारी खटला क्र.१४५/२०१३ चे अंतिम अहवालाची छायांकित प्रत, अटकपूर्व जामिन अर्ज क्र.१२०/२०१३ व त्यावरील आदेशाची छायांकित प्रत, गु.र.क्र.२६/२०१२ यामध्ये आरोपींना पोलीस कोठडी मिळण्याच्या दि.०४/०८/२०१७ रोजीच्या अर्जाची छायांकित प्रत व आदेश आणि संक्षिप्त फौजदारी खटला क्र.५५४/२०१७ च्या फिर्यादीची संक्षिप्त प्रत व आदेश दाखल केलेला आहे. तसेच, नि.क्र.१६५ चे यादीसमवेत प्रतिवादी यांनी वादीचे कुलमुखत्यारपत्र रद्द करण्याबाबतचा

ठराव व पोलीस संरक्षण मिळण्याबाबतच्या अर्जाची छायांकित प्रत दाखल केली आहे.

०७. वर सविस्तराने नमूद करण्यात आलेल्या व वर्णन करण्यात आलेल्या परिस्थितीचे व कागदपत्रांचे काळजीपूर्वक अवलोकन केले असता असे दिसून येते की, वादी यांचे तर्फे नि.क्र.५ ला दाव्याचे अंतिम निकालापर्यंत प्रतिवादी यांनी दावा मिळकतीमध्ये स्वत: अगर अन्य कोणत्याही त्रयस्थ व्यक्तीमार्फत कोणत्याही स्वरूपाचे बांधकाम करू नये अथवा दावा मिळकतीचे स्वरूपात कोणत्याही स्वरूपाचे बदल करू नयेत असा तुर्तातूर्त मनाई आदेश मिळावा याकरीता अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता क्रम ३९ नियम १ व २ अन्वये दिला होता. सदरच्या अर्जावर या न्यायालयाचे पूर्व पिठासिन अधिकारी यांनी दि.३०/११/२०२० रोजी एकतर्फा तात्पुरता मनाई आदेश पारीत करून प्रतिवादी क्र.३ यास दावा मिळकतीमध्ये तो न्यायालयात हजर होईपावेतो कोणत्याही प्रकारचे बांधकाम करू नये अशी ताकीद दिलेली होती. तसेच, वादी यांचे तर्फे नि.क्र.१०० वर नि.क्र.५ वरील ताकीदीचा हुकूम तो अर्ज गुणदोषावर निकाली होईपावेतो वाढवून मिळणेसाठी अर्ज दिला होता. सदरचे अर्जावर प्रतिवादी यांचेतर्फे म्हणणे न आल्यामुळे या न्यायालयाचे पूर्व पिठासिन अधिकारी यांनी नि.क्र.१०० दि.१६/११/२०२१ रोजी आदेश पारीत करून नि.क्र.५ चा आदेश पुढील आदेश होईपावेतो कायम केलेला दिसून येतो. अशी वस्तुस्थिती असताना प्रतिवादी यांचे तर्फे दावा मिळकतीमध्ये तिचे स्वरूप बदलण्याकरीता कृत्य चालू असल्याचे दिसून येते. वादी यांनी अर्जात नमूद केलेली कथने ही शपथेवर नमूद केलेली आहेत. तसेच, त्यांचे कथनाच्या समर्थनार्थ वर सविस्ताराने नमूद केलेली कागदपत्रे नमूद केलेली आहेत. न्यायालयाचा आदेश असताना दावा मिळकतीमध्ये तिचे स्वरूपामध्ये बदल झाल्यास वादीचे भरून न येणारे नुकसान होणार आहे. प्रतिवादी यांचेतर्फे उपस्थित करण्यात आलेल्या हरकती व मुद्दे या अर्जाचा विचार करतेवेळी लागू होत नसल्याने आवश्यक त्या वेळी त्या हरकतींचा विचार करण्यात येईल. या सर्व बाबींचा, कायदेशीर तरतूदींचा व दाखल करण्यात आलेल्या न्यायनिवाड्यांचा विचार करता वादीने प्रस्तुत अर्जात केलेली विनंती ही मंजूर होण्यास पात्र असल्याचे सकृतदर्शनी दर्शवून दिलेले

असल्याने सदरचा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. म्हणून मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. अर्ज (निशाणी क्र.१५९) मंजूर करण्यात येत आहे.

२. पोलीस निरीक्षक, कराड शहर पोलीस स्टेशन यांना असा आदेश देण्यात येतो की, वादी ज्या ज्या वेळी संरक्षण मागतील त्या त्या वेळी प्रतिवादी क्र.३ यांनी दावा मिळकतीमध्ये (सिटी सर्वे क्र.७३३ अर्जात मागणी केलेप्रमाणे) नि.क्र.५ च्या अर्जाचा गुणदोषावर निकाल होईपावेतो सदर मिळकतीमध्ये कोणत्याही प्रकारे बदल करू नये याकरीता संरक्षण द्यावे.

३. वादी यांना असा आदेश देण्यात येतो की, पोलीस संरक्षण मिळणेकरीता आवश्यक असलेला खर्च/ भत्ता त्यांनी परस्पर पोलीस स्टेशन येथे जमा करावा/ सोसावा.

४. सहाय्यक अधिक्षक, यांनी सदरच्या आदेशाबाबत पत्र संबंधीत पोलीस स्टेशनला अदा करावे.

५. वादी व प्रतिवादी यांना असा आदेश देण्यता येतो की, नि.क्र.५ चा अर्ज त्यांनी त्वरीत गुणदोषावर चालवून घ्यावा.

Digitally signed by SUDHIR BALASAHEB TODKAR
Date: 2024.08.31 11:05:50 +0530

कराड. (एस. बी. तोडकर )

दिनांकः २९/०८/२०२४ दिवाणी न्यायाधिश व.स्तर, कराड.